महा मेट्रो

PUNE METRO

# युरोपिअन समुदायाचे (युरोपिअन युनियन) राजदूत युगो अस्तुतो यांची पुणे मेट्रो प्रकल्पाला भेट




आज दिनांक ११ मे २०२२ रोजी युरोपिअन समुदायाचे भारतातील राजदूत युगो अस्तुतो यांनी पुणे मेट्रोला भेट देऊन मेट्रोच्या कामाचा आढावा घेतला. पुणे मेट्रोसाठी युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँकेने भरीव अर्थसहाय्य केले आहे आणि त्यामुळेच हा प्रकल्प आतापर्यंत ७४% पूर्ण करणे शक्य झाले आहे. युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँकेचे पदाधिकारी हे पुणे मेट्रोचा नियमित आढावा घेण्यासाठी भेट देत असतात. आजच्या युगो अस्तुतो यांच्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या भेटीमुळे पुणे मेट्रो व युरोपिअन समुदाय यांच्यातील संबंध आणखी दृढ होणार आहेत.

युरोपिअन समुदायाच्या राजदूतांनी सकाळी मेट्रोच्या फुगेवाडी येथील कार्यलयात पुणे मेट्रोच्या कामाचा आढावा घेतला. महामेट्रोचे श्री. अतुल गाडगीळ, संचालक (कार्य) व श्री. विनोद अग्रवाल, संचालक (ऑपरेशन) यांनी सद्यस्थितीतील मेट्रो प्रकल्पाची माहिती राजदूत युगो अस्तुतो यांना दिली.




श्री. युगो अस्तुतो, राजदूत, युरोपिअन समुदाय, श्रीमती रेनीटा भास्कर, मंत्री समुपदेशक, व्यापार आणि आर्थिक व्यवहार प्रमुख, युरोपिअन समुदाय आणि मेट्रो अधिकाऱ्यांनी फुगेवाडी स्थानक ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक व पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते संत तुकारामनगर स्थानक असा मेट्रोतून प्रवास केला. श्री. युगो अस्तुतो, राजदूत, युरोपिअन समुदाय यांनी पुणे मेट्रोच्या कामाबद्दल आणि विशेषतः मेट्रो स्थानकांच्या वैशिष्टपूर्ण संरचनेबाबत समाधान व्यक्त केले.

युगो अस्तुतो, युरोपिअन समुदायाचे भारतातील राजदूत म्हणाले: “युरोपियन युनियन आणि भारत हवामान बदलाविरुद्धच्या लढाईत आणि “हरित” सार्वजनिक वाहतुकीच्या विकासासह शाश्वत शहरीकरणासाठी एकत्र काम करत आहेत. युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक (EIB) ने भारतातील सहा शहरी रेल्वे प्रकल्पांमध्ये २.१ अब्ज युरोची गुंतवणूक केली आहे. पुणे हे यापैकी एक आहे आणि आज येथे येऊन मेट्रो मार्गावरील प्रगती माझ्या स्वत:च्या डोळ्यांनी पाहताना मला खूप आनंद होत आहे. नवीन मेट्रो हि शहरातील इतर वाहतुकीच्या पर्यायांना सुरक्षित, पर्यावरण पूरक आणि परवडणारा असा पर्याय देईल त्याचबरोबर प्रदूषण, वाहतूक कोंडी कमी करून कार्यालये, आरोग्य सुविधा केंद्रे किंवा शेक्षणिक संस्था येथे प्रवास करण्याचा सुलभ, जलद आणि परवडणारा पर्याय निर्माण करेल.”



महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी या भेटीप्रसंगी सांगितले की, "युरोपियन युनियनने दिलेल्या पाठिंब्याबद्दल महामेट्रो त्यांचे आभारी आहे आणि त्यांनी दिलेल्या या उदार पाठिंब्यामुळे आम्ही मेट्रो प्रकल्पाला गती देऊ शकलो. आम्ही युरोपियन युनियनकडून निरंतर सहयोगची अपेक्षा करतो."

युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँकेने पुणे मेट्रो रेल्वेच्या दोन नवीन मार्गांच्या बांधकामासाठी आणि १०२ आधुनिक मेट्रो गाड्या तयार करण्यासाठी EUR ६०० दशलक्ष गुंतवण्याचे वचन दिले आहे. पुणे मेट्रो सिस्टीममध्ये उन्नत आणि भूमिगत सह एकूण ३० स्थानके असलेले ३३ किमीचे ट्रॅक असतील आणि यामुळे सार्वजनिक शहर वाहतूक नेटवर्कची व्याप्ती वाढेल. एकदा पूर्ण झाल्यावर, पुणे मेट्रो रेल्वे ९०० नवीन रोजगार निर्माण करेल आणि दररोज सुमारे ६,००,००० प्रवाश्यांना सुरक्षित, परवडणारी, आणि जलद सेवा देईल. नवीन मेट्रो रेल्वे प्रणालीमुळे शहरात राहणाऱ्या साठ लाखांहून अधिक लोकांसाठी प्रवासाचा वेळ कमी होईल. आजपर्यंत, युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँकेने सहा शहरी रेल्वे प्रकल्पांमध्ये (€350m), बेंगळुरू (€500m), कानपूर (€350m), लखनौ (€450m), भोपाळ (€250m) आणि अगदी अलीकडे आग्रा येथे €2.2bn ची गुंतवणूक केली आहे.